महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३७/कोषा प्रशा-४,
वित्त विभाग, दालन क्र.३३७,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक-२५ ऑगस्ट , २०२०.

प्रति,

संचालक,
लेखा व कोषागारे संचालनालय,
मुंबई

**विषय :- "ग्रास"प्रणालीव्दारे पेमेंट ॲक्रॉस बॅक कांऊटर (Manual Challan) या विकल्पाव्दारे प्रदान करण्याची किमान मर्यादा रु ३००/- वरुन रु.५०/- इतकी करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

संदर्भ:-१. वित्त विभाग, परिपत्रक क्र.संकिर्ण १०११/प्र.क्र.१८/कोषा प्रशा-५, दि.०९.०८.२०११ व दि.२१.०४.२०११

२. आपले क्र.व्ह.ट्रे/न.क्र.८९अ/२०२०/१३३, दि.१२.०३.२०२० चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये, "ग्रास" प्रणालीव्दारे पेमेंट ॲक्रॉस बँक काऊंटर (Manual Challan) या विकल्पाव्दारे कर व करेतर रकमा प्रदान करण्याची किमान मर्यादा रु.३००/- वरुन रु.५०/- इतकी करण्यास मान्यता मिळणेबाबत विनंती केली आहे.

२. "ग्रास" प्रणालीद्वारे पेमेंट ॲक्रॉस बँक काऊंटर (Manual challan) या विकल्पाद्वारे प्रदान करण्याची किमान मर्यादा रू. ३००/- वरून रू. ५०/- इतकी केल्यास :-

१) "ग्रास" प्रणालीद्वारे मॅन्युअल चलन निर्माण करून त्याचे प्रदान ग्रास प्रणालीतील संबंधित बँकेच्या काऊंटरवर केले गेले तरी संबंधित चलन बँकेकडून इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच पूर्ण केले जाते. त्यामुळे अशा व्यवहारांचा (Transactions) स्क्रोल बँकेकडून नेटबॅकिंग/पेमेंट गेटवे मार्फत होणाऱ्या व्यवहारांच्या स्क्रोलसोबतच ग्रास प्रणालीत अपलोड केला जातो. त्यामुळे कोषागारातील चलनांची संख्या वाढून त्याचा भार वाढण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

२) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे संकिर्ण स्वरूपात जमा होणाऱ्या रकमा ह्या रू.३००/- पेक्षा कमी असतात. परंतू हस्तलिखित चलनाद्वारे अथवा "ग्रास" प्रणालीत मॅन्युअल चलनाद्वारे प्रदान करण्याची किमान मर्यादा रू. ३००/- असल्याने अशा रकमा शासन खाती वेळेत जमा न होता कार्यालयाच्या रोखपेटीत पडून राहतात. सदर रकमा शासन खाती वेळेत जमा करणे शक्य होईल.

(कृ.मा.प.)

Scanned with CamScanner

३) विविध विभागांकडील "ग्रास" प्रणालीतील मॅन्युअल चलनांची संख्या जरी वाढली तरी त्याबाबतचे कमीशन बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अदा केले जाईल. त्यामुळे शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

उपरोक्त बाबी लक्षात घेता, "ग्रास" प्रणालीत पेमेंट अक्रॉस बँक काऊंटर (through manual challan) द्वारे कर व करेतर रकमा प्रदान करण्याची किमान मर्यादा रू.३००/- वरुन रू.५०/- करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी संचालक, लेखा व कोषागारे यांचे स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(इंद्रजित गोरे)
उप सचिव, वित्त विभाग

प्रत-

१. कोषागार अधिकारी (आभासी), लेखा व कोषागारे संचालनालय, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई.

२. निवड नस्ती/कोषा-प्रशा-४

Scanned with CamScanner